# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

REACHING NATIONS

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | FEBRUARY 2023 | No. 01


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

**नीतिसूत्रे : ३:२६-३५**

२६) कारण परमेश्वर तुझा रक्षणकर्ता होईल, तो तुझा पाय गुंतू देणार नाही.

२७) एखाद्याचें बरें करणे उचित असून तें करण्याचें तुझ्या अंगी सामर्थ्य असल्यास तें करण्यास माघार घेऊ नको.

२८) एकादी वस्तु तुज जवळ असता, आपल्या शेजाऱ्याला असें सांगू नको की तूं जा आणि उद्यां परत ये; म्हणजे ती मी तुला देईन.

२९) तुझा शेजारी तुज जवळ निर्भय राहतो असे पाहून त्याचें वाईट योजू नको.

३०) एखाद्या मनुष्यानें तुझें वाईट केले नसता त्याजशी उगीच भांडण करू नको.

३१) जुलूम करणाऱ्याची स्पर्धा करुं नको, त्याची कोणतीहि रीत स्वीकारुं नको.

३२) कारण परेश्वराला कुटिलाचा वीट आहे; पण सरळांबरोबर त्याचे रहस्य आहे.

३३) परमेश्वराचा शाप दुर्जनांच्या घरावर असतो; पण धार्मिकांच्या वस्तीला तो आशीर्वाद देतो.

३४) उपहास करणाऱ्यांचा तो अवश्य उपहास करितो, पण दीनांवर तो कृपाप्रसाद करितो.

३५) ज्ञानी वैभवाचें वतनदार होतील, पण मूर्ख लज्जेची बढती पावतील.

# मोठे रहस्य / गूज THE GREAT MYSTERY!

(पास्टर एस्. सॅम सेल्वा राज)

**‘‘हे गूज मोठे आहे; हे मी ख्रिस्ताविषयी व मंडळीविषयी बोलतो.’’ (इफिस ५:३२)**

पृथ्वीवर स्वर्गीय अधिकाराचा उपयोग करण्याकरीता देवाची मंडळी हा पाया आहे. मंडळी हि संतांची सहभागीता आहे. प्रे.कृ.च्या पहिल्या दहा अध्यायानुसार, जे लोक येशू ख्रिस्ता सोबत होते, त्याज बरोबर राहिले; त्याचे प्रेम ज्यांनी अनुभवले, त्यांना ‘‘शिष्य’’ हे नाव देण्यात आले होते. सुरुवातीच्या शिष्यांना ‘‘ख्रिस्ती’’ हे नाव देण्यात आले होते. (प्रे.कृ. ११:२६). इतर कोणाचे त्यांच्यात सामील होण्यास धैर्य झाले नाही. (प्रे.कृ. ५:१३).

निष्ठावान किंवा विश्वासू ख्रिस्तीजन हे खोटे बोलणार नाही, इतरांना फसविणाार नाहीत आणि विश्वासघात करणार नाहीत. ते देवाच्या भयात चालतात. तुमचा कोणी विश्वासघात केला, तर त्याचा अर्थ ते देवाची लेकरे नव्हती. देवाच्या लेकरांशी तुम्ही मनमोकळेपणाने बोलू शकता. जे येशू ख्रिस्ताचा आदर्श अनुसरतात आणि त्याच्या पाऊलांना अनुसरतात ते देवाची लेकरे आहेत. जे येशू ख्रिस्ताला अनुसरतात, सर्व प्रकारच्या परिस्थितीत त्याला प्रदर्शित करितात, ते कठीण परिस्थितीत येशू ख्रिस्ताला नाकारणार नाहि




एको ऑफ हिज कॉल

**यू ट्युब ख्रिश्चन चॅनल**

*५ मिनिटांचा संदेश*

इंग्रजी आणि हिंदी — प्रत्येक दिवशी पहाटे ४ वाजता

तमिळ आणि तेलगू — सोमवार ते शनिवार - ५.०० वाजता; तमिळ फक्त रविवारी - ८.३० वाजता


पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत वैयक्तिकरित्या प्रार्थना करु शकता.

मल्याळम संदेश प्रस्ताव आणि प्रार्थना अंतर्गत आहेत! कृपया प्रार्थना करा.

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

REACHING NATIONS





### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


CHIEF EDITOR

Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

MANAGING EDITOR

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION

Bro. N. Prakasam, M.A., General Manager

EDITORIAL BOARD

Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran



EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858



CORE LEADERS

Bro. K. Puratchivendan
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah



E.mail ID

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL

Echo of His Call


**''...पाहा, मी तुजपुढें दार उघडून दिले आहे; ते कोणाच्यानें बंद करवत करवत नाही...''** (प्रकटी ३:८)

प्रभु मधील प्रियांनो,

आम्ही आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या नामात तुम्हा सर्वांना शुभेच्छा देत आहोत.

आम्हाला आम्ही एको ऑफ हीज कॉल मासिका द्वारे आणि 'यूट्युब'च्या माध्यमा द्वारे सुर्वाता प्रसार करण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांना प्राप्त होत असल्या देवाच्या आशीर्वादांबद्दल त्याचे आभार मानीत आहोत. पास्टर ॲलेक्स सॅमसन सॅम, पास्टर चीन्नया, धानम चीन्नया, मेरी मग्दालीन, एन्. प्रकासम, ख्रिस्तीना जेबा कुमारी चीन्नया, बी. सरन, पास्टर विद्याधर, अब्राहाम, सलोमी अब्राहाम, गीथा गुरुसामी, डेझी राणी, सालोमन रॉबर्ट, जॉशवा रॉबर्ट, एडमंड थॉमस इत्यादि हि सर्व देवाची लेकरे, जी मला 'यू ट्युब चॅनल'च्या सेवेत मदत करीत आहेत, त्यांच्या बद्दल देवाचे आभार मानीत आहे.

आम्ही पापाच्या भयंकर अशा स्वभावातून आणि शापाच्या बंधनातून काही जणांची तरी सुटका व्हावी यासाठी प्रयत्न करीत आहोत. याकरिता तुमच्या प्रार्थना पाठबळाची आम्हाला गरज आहे. सेवेचा मार्ग अत्यंत कठीण असा आहे. सैतान आमच्या त्याला विरोध करण्याच्या त्याच्यावर वरचढ होण्याच्या क्षमतेला मागे टाकण्यासाठी प्रकर्षाने प्रयत्न करीत आहे. केवळ आपला प्रीय प्रभुच आमचे रक्षण करीत आहे.

आम्हाला तुमच्या कठीण परिस्थितीची आणि समस्यांची कल्पना आहे आणि तुम्हांकरीता प्रार्थना करीत आहोत.

देवाच्या इच्छेनुसार, '**नहेम्या बायबल कॉलेजचा**' दिक्षांत वीधी जून २०२३ मध्ये होईल. आम्हाला पुढील २०२३-२४ या शैक्षणीक वर्षाकीता देवाने त्याच्या सेवेकरीता पाचारण केलेले असे विद्यार्थी हवे आहेत. कृपया यासाठी प्रार्थना करा. कृपया तुमच्या परिचयाचे असे विद्यार्थी असतील तर आम्हाला कळवा कोणत्याही भौतिक लाभाची अपेक्षा न करता. आम्ही सुर्वाता गाजविण्यासाठी परिश्रमपूर्वक कार्य करीत आहोत. कृपया आमच्या तामिळ आणि हिन्दी बायबल कॉलेज आणि सर्व विविध सेवा कार्याकरीता प्रार्थना करीत राहा.

आम्ही तुम्हाकरीता प्रार्थना करीत आहोत. देवाची कृपा तुम्हा सह राहो. आमेन.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**


**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : samselvaraj333@gmail.com


किंवा स्वत:च्या लाभाकरीता देवाच्या सेवा कार्याचा गैर वापर करणार नाहीत.

जगातील सर्वात मोठ्या रहस्यांपैकी जे एक रहस्य आहे. ते म्हणजे देवाच्या मंडळी मध्ये असणारा नाते संबंध, ते म्हणजे देवाच्या लेकरांचा देवाशी असलेला संबंध प्रभु येशू ख्रिस्त हे गूज किंवा रहस्य स्वर्गातून त्यांच्या विश्वासणाऱ्यांना मंडळीच्या द्वारे देत आहे. देवापासून ज्यांचा जन्म झाला आहे. ते देवाची लेकरे आहेत. हे लोक कदाचीत गरीब किंवा श्रीमंत परिस्थितीमधील असतील किंवा अश्रुंच्या दरीतून जात असलेले असतील. ते जीवनात निराश झालेले असे लोक असण्याची शक्यता आहे, किंवा इतरांनी त्यांचा त्याग केलेला असेल किंवा ते अगदीच निरुपयोगी


Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ◘ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ◘ Media Ministry ◘ Online Courses ◘ Theological Correspondence Courses (2 languages) ◘ Church Planting ◘ Nehemiah Bible Colleges ◘ Gospel Printing Press ◘ Great Commission Partners ◘ St. Paul's Matriculation School ◘ Crusades ◘ Community Development

असतील. परंतु जे येशूवर विश्वास ठेवतात ते देवापासून जन्मलेले आहेत. (योहान १:१३).

या जगात मनुष्याला विजयीशाली जीवन जगण्याकरीता आवश्यक असणारी सत्ये हि सर्व मंडळी आणि येशू ख्रिस्त यांच्यातील संबंधातील रहस्यात दडलेली आहेत. परंतु लोक याकडे दुर्लक्ष करून किंवा हे टाळून, त्यांच्या जीवनात प्रगती व्हावी यासाठी आनंद आणि शांति दुसऱ्या मार्गांनी शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. बायबल मध्ये जरी अनेक रहस्ये आढळतात, आपण जेव्हा येशू ख्रिस्त आणि मंडळी यांच्या मधील संबंधाच्या रहस्याचा उपयोग करतो, तेंव्हा आपल्या जीवनात बदल घडतो आणि आपण उंचावले जातो.

जगताचा उद्धारक - तारणारा येशू ख्रिस्त आणि त्याच्या मंडळीबद्दलच्या वस्तुस्थितीत समय किंवा संस्कृती किंवा नवीन तंत्रज्ञान याद्वारे बदल घडू शकत नाही. काही लोकांना येशू ख्रिस्ताबद्दल स्पष्ट ज्ञान नसल्यामुळे किंवा चुकीच्या माहितीमुळे त्यांना ख्रिस्ती धर्म नकोसा वाटतो किंवा त्याचा स्विकार करु नये असे वाटते. परंतु त्यांचे हे मत अगदी चुकीचे असे आहे. येशू ख्रिस्ताला विश्वासूपणे अनुसरल्यामुळे त्याला त्यागण्यात आले असा कोणी होता कां? कोणी गरिब झाला कां? असा कोणी आहे कां? ज्याने कोणत्याही प्रकाराने इतरांना त्रास दिला? या प्रश्नांना 'होय' असे उत्तर कोणीहि देवू शकणार नाही. ''मी तरुण होतो आणि आता म्हातारा झालो, तरी धार्मिक निराश्रित झालेला व त्यांची संतति भिकेस लागलेली मी पाहिली नाही.'' (स्तोत्र ३७:२५). येशू ख्रिस्ताला अनुसरलेला कोणीहि अन्नासाठी भटकताना आढळला नाही

येशू ख्रिस्ताचा जन्म दिन आणि नूतन वर्ष हे केवळ ख्रिस्तीजनच साजरा करीतात असे नाहीतर सर्व देशांतील लोकाद्वारे, सर्व धर्मियां द्वारे साजरा केला जातो. जानेवारी महिन्याच्या म्हणजे नूतन वर्षाच्या पहिल्या दिवशी, विशेष समारंभ आणि भक्ति सर्व धर्मियांच्या मंदिरात आणि उपासनेच्या ठीकाणी घेण्यात येते कां? सत्य हे नेहमीच सत्य असते. कोणीहि सत्य फार काळ नाकारु शकत नाही किंवा लपवून ठेवू शकत नाही. येशू ख्रिस्ताच्या जन्मानेच जगाचा इतिहास ख्रिस्त जन्म पूर्व (बी. सी.) आणि ख्रिस्त मृत्युनंतर (ए.डी.) अशा दोन भागात विभागला गेला. जग मार्ग भ्रष्ट झाल्यामुळे ज्या देवाने हि पृथ्वी निर्माण केली. तो येशू ख्रिस्त त्याने मनुष्य रुप धारण करुन त्याचे आपल्यावरील महान प्रेम त्याच्या जन्म, मृत्यु आणि पुनरुत्थाना द्वारे प्रगट केले. (रोम ५:८). सर्व कबरा ज्यामध्ये मृत व्यक्तिचे शरीर पुरले जाते. त्या सर्व कबरा बंद रहातात, येशू ख्रिस्ताची कबर मात्र उघडी आहे, कारण तो प्रभु आणि तारणकर्ता आहे. ज्याने मृत्युवर विजय मिळविला आणि जीवंत झाला! कोणीहि येशू ख्रिस्ताच्या मंडळीचा (चर्च) कदाचीत द्वेष करु शकतो आणि तीचा छळ करु शकतो. परंतु देवाची मंडळी (चर्च) हि काही मनुष्यांच्या नियंत्रणात नाही. ती थेट देवाच्या नियंत्रणात कार्य करीते.

जगाच्या अगदी सुरुवातीपासूनच, देवाच्या लेकरांच्या या सहभागीतेने (मंडळीने) भयंकर असे दु:ख आणि विरोध सहन केला. परंतु देवाच्या मंडळीची वाढ कोणीहि नियंत्रणात ठेवू शकलेले नाही. इतिहासात, आपल्याला वाचण्यात येते. ज्या देशांनी आणि अधिकाऱ्यांनी मंडळ्यांवर नियंत्रण करण्याचे प्रयत्न केले. त्यांची ओळख न पटण्या इतका भयंकर विध्वंस झाला. त्यामुळे आपण अतिशय सुज्ञतेने शुभवर्तमान गाजवावे. ज्यांना देवाच्या वैभवाची माहिती नसते, त्यांना देवाविषयीचे ज्ञान प्राप्त होते, तेव्हा त्यांना शांति प्राप्त होते. आज घडीला देखील जगातील विविध भागांतून लोक मंडळीत (चर्चमध्ये) सामील होत आहेत. दररोज अगणित अशा मंडळ्या स्थापल्या जात आहेत.

## १) मी माझी मंडळी रचीन!

येशू ख्रिस्त फिलिप्पाच्या कैसरीया कडल्या प्रांतात गेला, तेव्हा त्याने आपल्या शिष्यांस विचारिले, ''मनुष्याचा पुत्राला लोक कोण म्हणून म्हणतात?'' ते बोलले, कित्येक बाप्तिस्मा करणारा योहान, कित्येक एलीया, कित्येक यिर्मया किंवा संदेष्ट्यांतील कोणी एक असे म्हणतात.

तो त्यांस म्हणाला, ''पण तुम्ही मला कोण म्हणून म्हणता? शिमोन पेत्रानें उत्तर दिले, आपण ख्रिस्त जीवंत देवाचे पुत्र, आहा येशूने त्याला म्हटले, शिमोन बार्यो ना, धन्य तुझी कारण मांस व रक्त यांनी नाही, तर माझ्या स्वर्गातील पित्यानें हे तुला प्रगट केले आहे. आणखी मी तुला सांगतो की तूं पेत्र आहेस; आणि या खडकावर मी आपली मंडळी रचीन; व तिच्यापुढें अधोलोकाच्या द्वारांचें चालणार नाही.'' (मत्तरा १६:१७-१८).

येथे प्रभु पेत्राला इतर लोक त्याला काय म्हणून म्हणतात हे विचारीत आहे. येशूला देखील लोक त्याच्या विषयी काय म्हणतात हे जाणून घेण्याची कल्पना होती. यावरुन आपल्याला समजले पाहिजे कि प्रत्येक आत्मिक पुढाऱ्यांनी लोक त्याच्या विषयी काय बोलतात हे समजुन घेतले पाहिजे. त्यांनी असे म्हणू नये, ''लोक माझ्या विषयी काय बोलतात याची मला काळजी नाहि, मी माझ्या सद्सद्विवेक बुद्धिप्रमाणे काम करितो.'' येशूने पेत्राला लोक त्याच्या विषयी काय म्हणतात असे जेव्हा विचारिले शिमोनाने उत्तर दिले, ''आपण ख्रिस्त, जीवंत देवाचे पुत्र आहा.'' येथे पेत्र त्याला झालेल्या प्रगटीकरणा द्वारे बोलला. येशू ख्रिस्त म्हणतो मांस व रक्त यांनी नाही, तर स्वर्गातील पित्यानें त्याला प्रगट केले. आज लोक ख्रिस्तीजनांना मुर्ख, अज्ञानी लोक, शहाणपण नसलेले लोक, ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणारे आणि लोकांचे परिवर्तन करणारे लोक असे समजतात. एकादी व्यक्ति येशू ख्रिस्ताचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकारतात, त्याचा अर्थ मांस व

रक्त यांनी नाही तर ते स्वर्गीय पित्याने त्याला प्रगट केले.

ज्या आपण सर्वांनी येशू ख्रिस्ताचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकारीले आहे, ते आपण प्रभु द्वारे प्रकटीकरण झालेले आहोत. ज्यांनी त्यांच्या जीवनात प्रकटीकरण प्राप्त केले आहे ते आपला भूतकाळ विचारात न घेता स्वर्गीय पित्याचे झालेले आहेत.

प्रभु माझ्याशी बोलला नाही, किंवा मी प्रभुची वाणी ऐकली नाही, किंवा प्रभुशी तुमचे नाते नाही असे तुम्ही बोलू शकत नाही. कारण, प्रभु येशूने शिमोन पेत्राला म्हटले आहे. "...मांस व रक्त यांनी नाही, तर माझ्या स्वर्गातील पित्याने हे तुला प्रगट केले आहे.'' त्यामुळे तुम्ही प्रभु येशूचा तुमचा वैयक्तिक तारणारा स्विकारले. प्रभु येशू हा सत्य देव आहे, तो देवांचा देव आणि जगात सर्वोच्य असा आहे. हे दैवी प्रगटीकरण आहे. कोणीहि येशू ख्रिस्ताचा स्विकार जबरदस्तीने किंवा इतरांच्या प्रयत्नांनी करु शकत नाही, तर त्याचे प्रगटीकरण झाल्या वरच ते शक्य आहे. त्यामुळे, ज्यांना स्वर्गीय प्रगटीकरण झाले आहे. त्यांनी या जगापासून अलीप्त आणि वेगळ्या प्रकारे जीवन जगले पाहिजे.

लोक विविध मार्गांनी प्रगती करण्याचा प्रयत्न करितात, परंतु बायबल शिकविते, कि केवळ देवाची लेकरेंच किंवा ज्यांना त्याचे प्रगटीकरण झाले आहे ते जर त्याने शिकविल्या नुसार करतील तर, जीवनात समृद्धि पावतील, हे कदाचीत चमत्कारिक वाटेल.

## २) माझी मंडळी

या जगात कोणतीहि व्यक्ति कोणतेही काम करु शकते. परंतु मंडळी उभारण्याचे काम सर्वस्वी देवाच्या हातात आहे. मत्तय १६:१८ या वचनात येशू म्हणतो, "...मी आपली मंडळी रचीन...'' तो इमारती विषयी बोलत नाही. इमारत ही देवाची लेकरें एकत्र येण्याचे ठीकाण आहे. देव स्वत: त्याची मंडळी उभारील. आपण सर्वजण एकत्रीत येतो ती देवाची मंडळी.

तुम्ही जे देवाची लेकरे आहा त्या तुम्हाला देव रचिल. देव वचन देतो, की अधोलोकाचे तुमच्यावर वर्चस्व होणार नाही. आपण जेव्हा हे मान्य करीतो, तेव्हा देवाच्या मंडळीला आपल्या जीवनात महत्व दिली पाहिजे. प्रभु म्हणतो की, तो आपल्याला रचील आणि समृद्ध करील. अधोलोक आपल्यावर विजयी होऊ शकणार नाही. देव हि आश्वासने त्याच्या हातात ठेवितो. तुम्ही जी त्याची मंडळी आहात, त्या तुमच्या त्रासाकडे आणि दु:खाकडे पाहिल आणि तुम्हाला रचील. आजार, त्रास, कर्ज, दारिद्र्य, दुष्ट शक्तिपासूनचा त्रास या पैकी काही देखील तुमच्या विरुद्ध सफल होणार नाही. तो देव आहे, हे तुम्हाला मांस व रक्त यांनी प्रगट केले नाही, तर स्वर्गाने प्रगट केले. देवाच्या मंडळीत एकत्रीत झालेल्या कोणालाही तो त्यागणार नाही.

देव त्यांची तुलना खडकावर घर बांधणाऱ्या लोकांशी करितो. मनुष्य वाळूवर आपले घर बांधितो. त्यावर देखील वारा वाहतो. जोराची पर्जन्यवृष्टि होऊन पूर येतो आणि ते घर स्थिर रहाते. अडचणी किंवा अपयश, त्याच्या जीवनात आले तरी देखील तो स्थिर उभा राहातो. प्रभु तुम्हाला रचील/उभारील कारण तुम्ही त्याची मंडळी आहा. अधोलोकाच्या द्वाराचे तुमच्यावर वरचस्व होणार नाही प्रभु म्हणतो की तो तुमची तुलना खडकावर घर बांधणाऱ्या मनुष्याशी करील.

आपण देवाच्या मंडळीत असतो तेव्हांच विजयशाली असतो. यामुळेच बायबल इब्री १०.२५ वचनात म्हणते, "आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणें सोडू नये.'' अनेकांना मंडळीत उपासनेला हजर रहावे कठीण वाटते - मंडळी फारच दूरवर आहे, ते थकलेले आहेत, वाहानाची सोय नाही, इत्यादी कारणे देतात; अशामुळे ते देवाच्या मंडळीत जाऊन, त्याची आराधना करुन, आशीर्वाद प्राप्त करुन घेण्याची संधी गमावतात. हे गुज फार मोठे आहे, येशू ख्रिस्त आणि देवाच्या मंडळीच्या संबंधातील रहस्य तुम्ही जर मंडळीत असाल तर या जगातील कोणतीहि गोष्ट तुमच्यावर वर्चस्व गाजवू

(...पान ६ वर)


नहेम्याह बाइबल कॉलेज
रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यम: हिन्दी

ECHO OF HIS CALL 1969-2019 REACHING NATIONS

ATA Regd. Candidate for Membership NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ECHO OF HIS CALL Estd. 1969

सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार - ATA

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल
डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!

Contact : The Chairman, Nehemiah Bible College.
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✶ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ✶

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ फेब्रुवारी २०२३ ते १८ मार्च २०२३ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ फेब्रुवारी** : सर्व दुष्ट शक्तिपासून आमचे वरिष्ठ पास्टर एस्. सॅम सेल्वराज आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण केल्या बद्दल.

**२० फेब्रुवारी** : तरुणांना उस्ताहाने मंडळीच्या सर्व कार्यक्रमात सहभाग घेण्याकरिता आशीर्वाद दिल्या बद्दल.

**२१ फेब्रुवारी** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, महान आज्ञापालनातील भागीदार आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता.

**२२ फेब्रुवारी** : आमच्या यू ट्युब वरील **एको ऑफ हिज कॉल** चॅनलवर आश्चर्यकारक रित्या संदेश प्रसारण करणाऱ्या टिम (संघा) बद्दल.

**२३ फेब्रुवारी** : यू ट्युब प्रसारणाकरिता विशेष प्रकारचा कॅमेरा उपलब्ध करुन दिल्या बद्दल.

**२४ फेब्रुवारी** : आमच्या वरिष्ठ पाळकांच्या विविध सेवाकार्या द्वारे शुभवर्तमान गाजविण्याच्या समर्पितपणा बद्दल.

**२५ फेब्रुवारी** : आमच्या **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबियांना उत्तम आरोग्य देवून सुरक्षित ठेविल्या बद्दल.

**२६ फेब्रुवारी** : आमच्या सेवेतील भागीदारां द्वारे प्राप्त होत असलेल्या नैतिक आणि आर्थिक आधारा बद्दल.

**२७ फेब्रुवारी** : आमच्या **प्रसार माध्यम सेवा** आणि **एको ऑफ हिज कॉल** यू ट्युब चॅनल द्वारे बहुभाषिक लोकांपर्यंत शुभवर्तमान पोहचविण्याची सेवा आशीर्वादित करीत असल्या बद्दल.

**२८ फेब्रुवारी** : आमचे २०२३चे कॅलेंडर आणि अभिवचन कार्ड छापून ते टपालाद्वारे पाठविता येणे शक्य झाल्या बद्दल.

**०१ मार्च** : मंडळीतील सेवा अधिक शिस्तबद्ध रितीने करण्यास आशीर्वाद दिल्या बद्दल.

**०२ मार्च** : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या विद्यार्थ्यांकरिता संगीत वर्ग सुरु करणे शक्य होऊ दिल्या बद्दल.

**०३ मार्च** : निवासी **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** मधील ख्रिस्तजन्म दिनाचे कार्यक्रम आशीर्वादित केल्या बद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ मार्च** : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या निवासी आणि सायंकालीन २०२३-२४च्या शैक्षणिक वर्षा करिता योग्य विद्यार्थी मिळावेत.

**०५ मार्च** : २०२३-२४ या शैक्षणीक वर्षाकरिता **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल** साठी नवीन विद्यार्थी मिळावेत.

**०६ मार्च** : सर्व दुष्ट शक्तिपासून आमचे वरिष्ठ पाळक एस्.सॅम सेल्वा राज व त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण व्हावे.

**०७ मार्च** : जगातील सर्व देशांचे नवीन कोवीड महामरी पासून दैवी संरक्षण प्राप्त व्हावे.

**०८ मार्च** : आमच्या मुद्रणालयातील तांत्रिक कर्मचारी, वाहन चालक आणि संगणक चालकांकरिता प्रार्थना करा.

**०९ मार्च** : सर्व राष्ट्रांतील तरुणांनी आणि लेकरांनी येशू ख्रिस्ताला त्यांचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकार करावा.

**१० मार्च** : ख्रिस्ती प्रचारकांनी शुभवर्तमान; त्यात भेसळ न करता गाजवावे.

**११ मार्च** : तुरुंगात कैद्यांमध्ये सेवा करणाऱ्या मिशनऱ्यांकरिता.

**१२ मार्च** : संगणकाशी थेट जोडल्या गेलेल्या खेळाच्या आहारी जाण्यामधून जगातील लेकरांचे रक्षण व्हावे.

**१३ मार्च** : पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांच्या **एको ऑफ हिज कॉल** यू ट्युब चॅनलच्या माध्यमातून अधिक भाषांमधून संदेश प्रसारीत करण्याच्या सेवेकरिता.

**१४ मार्च** : शिक्षण देण्याच्या आणि भाषांतर करण्याच्या सेवेत सहकार्य करणाऱ्या सर्व सहकार्यांकरिता.

**१५ मार्च** : आमच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता.

**१६ मार्च** : वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यात यशस्वी व्हावेत.

**१७ मार्च** : इस्त्राएल देशांत शांतता असावी.

**१८ मार्च** : वृद्धाश्रमांतील वृद्धांकरिता.

(पान ४ वरुन)

शकणार नाही. तुम्ही विजयशाली असणार.

जे देवाच्या मंडळीचे सभासद आहेत - जे संत मंडळीत भाग घेतात - ज्यांनी येशू ख्रिस्ताचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकार केलेला आहे. ते उच्च्य वर्गातील लोक आहेत. त्यांच्या नाश करण्याचा अधिकार जगात कोणाला देखील नाही. जीवनातील सर्व अपयश तुमच्या करीता विजय ठरतील. स्वर्गीय अधिकाराचा या जगात उपयोग करण्याचा पाया मंडळी आहे. मंडळ्यांच्या द्वारेच देव जगातील देशांना आशीर्वाद देतो.

ही वस्तुस्थिती लोकांना जर सांगितली तर त्यांना ती समजणे कठीण जाते. ख्रिस्ती धर्म अनुकरण करणारे कमी अधिकार असलेले आणि त्रासात असलेले असे लोक आहेत. तुम्ही कदाचित विचाराल ''हे देवाने निवडलेले लोक आहेत?'' उत्तर ''होय'' असे आहे, कारण ते सत्य आहे - खरे आहे. येशू ख्रिस्ताचा स्विकार केलेले लोक, या जगाचे नाहीत. त्यांचे रक्षण स्वर्ग करतो.

### ३) मंडळीत रोपलेले होतील उत्कर्ष पावतील :

**''जे परमेश्वराच्या मंदिरात रोपलेले असतात ते आपल्या देवाच्या अंगणात समृद्ध होतील.''** (स्तोत्र ९२:१३).

आपण कृत्रिम रोपटे उपटून पुनः ते मातीत रोपण करु शकतो. त्याला पाणी घालण्याची गरज नाहि. देवाच्या मंदिरात रोपले गेलेले कृत्रिम रोपासारखे तात्पुरते रोपलेले नसतात. नैसगिक रोपाची लागवड मातित केली जाते आणि त्याला पाणी घालण्यात येते. ज्याचे जीवन फळ देणाऱ्या रोपासारखे असते, ते देवाच्या मंडळीत समृद्ध होतील. केवळ अशाच प्रकारच्या रोपासारखे जीवन असणारे खऱ्या अर्थाने त्यांच्या जीवनात भरभराटीस येतात.

देवाच्या मंडळीत रोपलेले, पाणी आणि खत घालण्यात आलेले ते देवाच्या मंडळीत मुळावले जातील, भरभराट पावतील आणि मंडळीत फळे देतील.

जे सर्वजण मंडळीत समर्पितपणे सेवा करितात, पाळकांना मदत करण्या द्वारे फळे देतात, ते भरभराट पावतील. हल्ली बहुतेक लोकांना तशी इच्छा नाही. काही लोक, त्यांचा मंडळीत बाप्तिस्मा झाल्यानंतर, असा समज करुन घेतात कि त्यांचे तारण झाले आहे, ते मंडळी सोडून जातात आणि स्वत:ची संस्था स्थापन करुन देवाला प्रिय नसलेले कार्यक्रम/कार्य करुन सर्वप्रकारच्या अडचणीत सापडतात. सरतेशेवटि सर्व काही केले त्यासर्वांपासून दूर होण्याची वेळ येते. तुम्ही जर देवाने तुम्हाला त्याच्या मंडळीसाठी दिलेला दृष्टांत, काम आणि जबाबदारी यांचा विश्वासूपणे सराव केला तर तुमची भरभराट होईल. हेच जर सामान्य व्यक्तिला सांगितले तर त्यांना ते समजणार नाही. मी तरुण मुलगा होतो, मी माझ्या जुन्या पाळकाला प्रार्थना घराची स्वच्छता करुन मदत करीत असे. ती माझी सेवा होती. या छोट्याशा सेवेमुळे देवाने मला ह्या वैभवी सेवेत घेऊन आला. तुम्ही मंडळीत रोपलेले आहात, कि केवळ नावापुरतेच आहात? आजकाल पुष्कळशे लोक मंडळीत भक्कम रित्या रोपले गेले विश्वासणारे नाहीत; तर केवळ पाहुणे किंवा भेट देणारे असे आहेत. जमिनीत व्यवस्थित रोपलेले रोपटे फळ देते. अनेकांचे जीवन निष्फळ असे आहे. आपण म्हणतो की आम्ही विश्वासणारे आहोत, पाहुणे/भेट देणारे नाही. तुम्ही देवाच्या मंडळीत जितके अधीक सहभागी व्हाल; तितके अधीक भक्कम असे रोपलेले व्हाल, आणि मंडळीत जितके अधीक फळ द्याल तितक्या अधीक प्रमाणात देव तुम्हाला फलद्रुप करील.

स्वतंत्र सेवा करणाऱ्या सेवकांना सुप्रसिद्ध पास्टर जी. सुंदरम (आता प्रभुत विलीन झालेले) सांगत असत,'' तुम्ही सेवाकार्य कोठेही आणि तुम्हाला वाटते त्या मार्गानी करु शकता; परंतु तुम्ही कमरेला दोरखंड/रश्शी बांधावी आणि तिचे एक टोक मंडळीला बांधून ठेवावे. तुमच्या मंडळीला तुम्ही महत्व दिले पाहिजे. तुम्हाला शक्तिबळ केवळ तेथूनच मिळणार; नाहितर आध्यात्मिक जीवनात तुम्ही अनाथ असे व्हाल. त्यांनी

(...पान ८ वर)


## नहेम्या बायबल सायं कॉलेज
### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. बायबलकोर : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी
३. एको ऑफ हिज कॉल : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी
**१३. तामिळ उपासना : सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी**
**१४. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१५. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
१७. पाळकांचे समुपदेशन : सायंकाळी ४ वाजता - रविवारी
१८. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
१९. साप्ताहिक शास्त्राभ्यास : सायंकाळी ६.३० वाजता - बुधवारी
२०. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२१. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२२. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२३. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२४. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२५. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२६. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार
२७. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार
२८. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
२९. सकाळचे मनन : पहाटे ५ वाजता - दररोज
३०. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३१. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**
Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## माझी क्षेत्रिय सेवा

देवाने मला खुल्या मैदानातील छोट्या सुवार्ता सभा मधून आणि गृह सभातून सुवार्ता प्रसार करण्यासाठी चांगले मित्र दिले. डी. रिचर्ड थंबीराज, विल्यम, सेल्वा राज, बिजीली सॅमराज, पी. चंद्रशेखर, मिसेस जे. व्हि. सेलवन इत्यादि मला सेवेमध्ये मदत करीत होते.


आमच्या विभागाच्या जवळील नवलार नगर येथे खुल्या जागेत जेव्हा मी सभा घेतली, त्या सभेत प्रभु येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्याचा स्पर्श अनेकांना झाला, दुष्टात्मा लागलेल्याची सुटका झाली आणि आजाऱ्यांना आरोग्य प्राप्त झाले. अशा प्रकारे देवाच्या अभिषेक कार्यास सुरुवात झाली.

त्या विभागातील गरीब, श्रीमंत, शिक्षित आणि अडाणी अशा अनेकांनी प्रभु येशू ख्रिस्ताला त्यांच्या वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकारिले. पुष्कळसे चमत्कार घडले. मी माझे ॲकॉर्डीयन नावाचे वाद्य वाजवून गाणे गात असे, मुलांसाठी कार्यक्रम करीत असे. आणि अशा प्रकारे देवाने मला येशू ख्रिस्ताचा सेवक म्हणून उंचावले. लोक त्यांच्या जीवनात चमत्कार घडू लागल्यामुळे आणि जीवनात बदल घडू लागल्यामुळे मला मान देवू लागले आणि माझ्या प्रार्थना सभांना उपस्थित राहू लागले. मी शेमन कॅथलीक किंवा पॉटेस्टंट पथांच्या मंडळीत सभासद असलेल्या कोणत्याहि ख्रिस्ती व्यक्तिंना मंडळीत स्विकार केला नाहि. देवाने मला येशू ख्रिस्ताला अनुसरण्यास आणि त्याची सेवा करणारे नवीन विश्वासणारे दिले. मी माझ्या मित्रांना 'फेथ प्रेअर ट्रॅक्ट लिग' या संस्थेच्या रेव्ह. सॅम्युएल डॅनियल यांच्या द्वारे मिळणाऱ्या शुभवर्तमान हस्तपत्रिका वाटण्याचे प्रशिक्षण दिले. याशिवाय त्यांना गाणे गाण्यास, साक्ष देण्यास, उपदेश करण्यास आणि नवीन आत्म्यांच्या भेटी घेण्यास शिकविले. अशा प्रकारे मी देवाने मला वेगवेगळ्या देशांतील सुर्वाता न पोंहचलेल्या लोकांपर्यंत ती सर्व प्रकारे, सर्व प्रकारची किंमत देवून आणि सर्वत्र पोहचविण्याचे ओझे दिले आहे. त्या करीता व्यस्त राहण्यास व माझ्या स्वत:च्या जीवाच्या समृद्धि करीता प्रार्थना करण्याच्या जीवनास सुरुवात केली. ''**दुर्बलांस प्राप्त करुन घेण्यासाठी मी दुर्बलांस दुर्बल झालो. मी सर्वांसाठी सर्व कांही झालो आहे, या साठी की मी कसे तरी कित्येकांचे तारण साधावें**'' (१ करिंथ ९:२२).



**रेव्ह. सॅम्युएल डॅनियल**

१९७३ सालात, एके दिवशी मी माझे मित्र बंधु. जे.आर. जयाबालन जे माऊंट रोड वरील ई.एल्.एस्. बुक शॉपचे मॅनेजर होते त्यांच्या सोबत त्यांच्या दुकानासमोर ''द बेस्ट आय कॅन!' शिर्षक असलेली सुवार्ता हस्तपत्रिका वितरण करीत होतो, देवाच्या महत्वाच्या पुढाऱ्यांमधील रेव्ह. डॉ. ऑगस्टीन पिटर या पुढाऱ्यांशी भेट झाली. त्यांनी भर रस्तात गर्दी असताना माझ्या डोक्यावर हात ठेवून प्रार्थना करीत, भविष्यवाणी केली, ''हा येथे असलेला मुलगा माझ्या द्वारे सुवार्ता प्रसार सेवेकरीता मी नियुक्त केला आहे. मी त्याला पाचारण केले आहे. मी त्याला असामान्य अशी दाने, आरोग्य, धन आणि जगभरातील लोक देईन. तो माझा विश्वासू सेवक आणि प्रिय मुलगा होईल, त्यावर मी आशीर्वाद ओतीन.



***रेव्ह. डॉ. ऑगस्टीन पिटर आणि पाळक एस सॅम सेल्वा राज***

काही दिवसानंतर त्यांनी माझे मित्र बंधु सी.एन्. राजन जे फोटोग्राफर होते त्यांच्या द्वारे बोलावले व मला सुवार्तेचा सेवक म्हणून अभिषेक केला. आज देखील माझ्या जीवनात तीच शक्ति-बल, दिव्य दृष्टि आणि स्थिरता वास करीत आहे. हे प्रामुख्याने निर्देशीत करीतो. त्यांनी उच्चारीलेला प्रत्येक शब्द पूर्ण होत आहे. मी त्याबद्दल देवाचे आभार मानितो. ***

(पान ६ वरुन...)

हे शब्द अगदी आव्हानात्मक रित्या त्यांना सांगितले. हे किती तरी मोठे असे सत्य आहे.

तुमच्या करीता हा संदेश लिहिणारा लेखक देखील एका पुढाऱ्याच्या मार्गदर्शना खाली कार्य करीत आहे आणि आशीर्वादीत आहे. देवाने मला अनेक सहाय्यक पास्टर देवून देखील आशीर्वादीत केले आहे. मी माझ्या वरिष्ठांच्या आज्ञेत आहे. आनंदीत आहे. तुम्ही कोणत्या अवस्थेत आहात?

### ४) प्रभुचा आनंद देणारा दिवस

''तूं शब्बाथाची पायमल्ली करणार नाहीस, माझ्या पवित्र दिवशी आपला उद्योगधंदा करणार नाहीस, शब्बास

आनंनदिन आहे, परेमश्वराचा पवित्र व सन्मान्य दिन आहे असे म्हणून त्याचा आदर करिशील, व त्या दिवशी आपला धंदा चालविणार नाहीस, वायफळ गोष्टी बोलत बसणार नाहीस; तर तूं परमेश्वराच्या ठायी हर्ष पावशील; ''तूं देशांच्या उच्च स्थलांचे जयोत्साहाने आक्रमण करिशील; असे मी करीन आणि माझा पिता याकोब याच्या वतनाचा तुला उपभोग घेऊ देईन, परमेश्वराच्या तोंडचे हे शब्द आहेत.'' (यशया ५८:१३-१४).

आपल्या सर्वांना उच्च स्थान हवे असते. आपल्या स्थानात सुधारणा हवी असते. ती कशी प्राप्त होऊ शकते? प्रभुच्या दिनी, म्हणजे रविवारी दुर्जनांच्या मसलतीपासून दूर राहून देवाला संतुष्ट करणाऱ्या गोष्टी कराव्यात. तुम्हाला स्वत:ला आवडणाऱ्या गोष्टी करु नये आणि वायफळ गोष्टी बोलू नये; कारण तो प्रभुचा आनंददिन आहे. हा दिवस चांगला दिवस आहे आणि सन्मानाचा दिवस आहे. या दिवशी टि. व्ही. वर इतर कोणतेहि कार्यक्रम पाहू नये- तर मंडळीच्या उपासनेला महत्व देवून, त्यात सहभागी होवो हे कर्तव्य आहे हे ध्यानात असावे. तेव्हाच तुम्ही प्रभुमध्ये आनंदिन व्हाल. याचा अर्थ इतर दिवशी तुम्ही मनाला वाटेल तसे वागू-वर्तु शकता असा होत नाही.

रविवारी, सकाळच्या उपासनेनंतर, जर तुम्ही स्वत:च्या जगीक गोष्टी आणि काम करण्यात वेळ घालविण्याची योजीत असाल, तर तुम्हाला जीवनात खरा आनंद मिळणार नाही. जीवनात उन्नति होणार नाही. हा दिवस तुम्ही प्रभुकरीता समर्पित करावा. हा दिवस, तुम्ही जर जगातील मित्रांना भेटण्याकरिता किंवा स्वत:चीच कामे करण्यासाठी खर्च कराल, तर तुमच्या जीवनात तुम्ही प्रगती करणार नाही.

प्रभुचा दिवस हा आनंददिन आहे हे मान्य कराल आणि तो प्रभुकरिता वेगळा ठेवाल तर तुम्ही सुखी व्हाल. या भुतलावर, प्रभु तुम्हाला उच्च स्थानी बसविल. तुमच्या जीवनात जर आर्थिक किंवा प्रकृति स्वास्थाची उणीव असेल किंवा आत्मिक जीवनात औदासिन्य असेल किंवा इतरांकडे जे आहे ते तुमच्याकडे नाहि असे वाटत असेल आणि तुम्ही प्रभुला प्रश्न कराल, ''असे कां''? उत्तर आहे. या संदेशाद्वारे पवित्र आत्मा तुमच्याशी स्पष्ट रितीने बोलत आहे. तुम्ही त्याचा दिवस हा आनंददिन आहे हे माना, म्हणजे तुम्ही सुखी व्हाल आणि प्रभु तुम्हाला उच्च स्थानी ठेवील.

## ५) आर्थिक आशिर्वाद

''सेनाधीश परमेश्वर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश तुम्ही भांडारात आणा, म्हणजे मी आकाश कपाटे उघडून जागा पुरणार नाही एवढा आशीर्वाद तुम्हांकरिता वर्षितो की नाही याविषयी माझी प्रतीति पाहा.'' (मलाखी ३:१०).

''जर मी माझ्या उत्पन्नाचा काही भाग दिला, तर माझे पुढील दिवस चांगले जातील कां?'' काहींना हा प्रश्न असतो. आपल्या सर्व उत्पन्नाचा दहावा हिस्सा हा देवाचा आहे. तुम्ही कर्ज घेतलेल्या पैशांचा दहावा हिस्सा हा देवाचा आहे. तुम्ही कर्ज घेतलेल्या पैशांचा दहावा भाग देवू नये. तुमच्या मिळकीतीचा दहावा भाग देवाचा आहे. देवाचा अधिकार असलेला हा पैसा आपण कोठे दिला पाहिजे? तुमच्या मंडळीच्या भांडारात तो आणावा. तुमचा दशमांश हा सुवार्ता प्रसार कार्याकरिता, किंवा मासिक प्रकाशन सेवेकरिता किंवा मिशनरी कार्याकरिता नसावा. तो कोणत्या तरी विभागात कोणत्या तरी सुवार्तिकाने सुवार्ता मोहिम केली तेथे देण्यात येवू नये. तो ज्या मंडळीचे तुम्ही सभासद आहात पूर्णपणे त्या मंडळीचा आहे. मंडळी त्याचा विनीयोग सेवाकार्यासाठी, गरिबांसाठी आणि गरजवंतासाठी आणि विभागातील देवाच्या सेवा कार्याकरिता करु शकते.

देवाचा पैसा देवासाठी खर्च करते अशी मंडळी शोधून तिचा सभासद व्हावे, हि अतिशय महत्त्वाची बाब आहे. बायबल तुम्हाला तुमचा दशमांश मंडळीच्या भांडारात आणा असे सांगते. विश्वासणाऱ्यांना तो खर्च करण्याचा अधिकार नाही. दशमांश उचलून तो इतरत्र देण्याचा विश्वासणाऱ्यांना अधिकार नाही.

मंडळीच्या-मंदिराच्या भांडारात दशमांश घेऊन या. प्रभु परेश्वर त्याविषयी तो स्वर्गिय कपाटे उघडून आशीर्वादाची वृष्टि करीतो कि नाही त्याची प्रतिती पाहा असे सांगत आहे. आपण देवाच्या वचनांतील एकादा शब्द देखील बदलू नये. दशमांश देण्याद्वारे आशीर्वाद प्राप्त झालेली अशी व्यक्ति मी आहे. कधी-कधी मिळकत छोटिशी असते, तेव्हा आपण दशमांश देतो. परंतु मिळकत-आमदानी वाढली कि दशमांश देण्यास जड वाटते. १०० रुपये मिळकती वर दहा रुपयें, १००० रुपयावर शंभर रुपये देणे शक्य होते, परंतु १०,००० रुपयांवर एक हजार रुपये देणे सहज शक्य नाही. प्रभु परमेश्वर आपल्याला जस जसा

## SPECIAL ANNOUNCEMENT

### We Need Honorary Representatives!

Of late, we find that the number of readers of **Echo of His Call** magazine printed in Sinhala, Nepali, Urdu and Afrikaans languages has considerably reduced. This may be due to the loss of our old friends and the probable relocation of their domicile. We have been thinking of ways and means to strengthen the number of readers.

As a measure of effort, we solicit Honorary Representatives from our readers of Nepali, Urdu, Sinhala and Afrikaans to

(i) Enroll more and more readers for the magazines in their respective languages.

(ii) To come forward to print more copies and dispatch to the readers in their respective countries / areas and

(iii) Help us by raising some Honorary Representatives to provide new addresses and to promote the distribution by taking photo copies and sending them to family and friends.

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

अधीक आशीर्वाद देत रहातो आणि आपण विश्वासूपणे त्याचा दशमांश त्याला देतो, तर तो आपल्याला विपुल आशीर्वाद देईल. तुम्ही तुमच्या मंडळीत दशमांश देता, तेव्हा देव आशीर्वादांची वृष्टि करण्यास स्वर्गीय कपाटे उघडणार हे एक फार मोठे गूज-रहस्य आहे. तुम्ही हे करा आणि काय घडते ते पाहा विजय तुमचा असणार!

* * * * * * * **

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-      आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 13th FEBRUARY 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**